# जिल्हा परिषद अहमदनगर

## ग्रामपंचायत विभाग

### योजना

- ♦ १२ व्या वित्त आयोगातून घ्यावयाच्या योजना
- ♦ बाराव्या वित्त आयोगांतर्गत कामे (पंचायत समिती)
- ♦ यशवंत ग्राम समृध्दी योजना
- ♦ तिर्थक्षेत्र विकास योजना
- ♦ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना
- ♦ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अनुज्ञेय कामे (परिशिष्ट - २)

## १२ व्या वित्त आयोगातून घ्यावयाच्या योजना-

महाराष्ट्र शासनाकडील ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ -यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -बाविआ-१००५/प्र.क्र.४२०/वित्त-४, दि.१९ डिसेंबर २००५ अन्वये पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी १२ व्या वित्त आयोगातंर्गत राज्य शासनास प्राप्त होणारा निधी प्रत्येक वर्षी पंचायत राज संस्थांच्या तीनही स्तरावर उपयोगात आणावयाचा आहे.

जिल्हा परिषदेने बाराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणा-या निधीतून मुख्यतः खालील कामे घ्यावीत.

१. मोठया पाणी पुरवठा योजनांचे पुनरुःजीवन व विस्तारीकरण.

२. गावांअतर्गत सिमेंट कॉक्रिटचे गटारे व अनुषगिंक रस्ते.

३. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी पाणी पुरवठा व स्वच्छता सोई-सुविधा पुरविणे.

४. प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती व रुग्णांसोबत येणा-या व्यक्तिंसाठी सुविधा.

५. ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम.

६. फॉगिग मशिन, जलशुध्दीकरण यंत्रणा इ.साहित्य जिल्हा परिषदांनी आवयकतेनुसार राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने खेरदी करण्यास हरकत नाही.

TOP

**पंचायत समितीने बाराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणा-या निधीतून मुख्यतः खालील कामे घ्यावीत.**

१. शाळामध्ये शुध्द पाण्याची व्यवस्था व स्वच्छतागृहाची दुरुस्ती.

२. दहन व दफनभूमी व्यवस्था

३. प्राथमिक शाळांच्या वर्गखोल्याची दुरुस्ती

४. पशु वैद्यकिय  दवाखाने दुरुस्ती व सुविधा

५. अंगणवाडी दुरुस्ती देखभाल व सोई सुविधा.

**ग्रामपंचायतींनी प्राप्त निधीचा विनियोग प्रामुख्याने पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता यासाठी वापरावयाचा आहे. या व्यतिरिक्त हा निधी खालील कामांसाठी वापरता येईल.**

१. पाणी पुरवठा योजना दुरुस्ती व देखभाल.

२. गटारे व अनुषंगिक रस्ते दुरुस्ती व देखभाल.

३. सार्वजनिक संडास दुरुस्ती.

४. ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन(ट्रॅक्टर,ट्रॉली इ.ची खरेदी व दुरुस्ती धरुन)

५. धुरीकरण मशिन व त्यासाठी औषधे खरेदी तसेच मुख्य उदिष्टांना धरुन इतर अनुषंगिक कामे.

६. ग्रामपंचायत कार्यालय देखभाल व दुरुस्ती.

ग्रामपंचायत स्तरावरील निधी हा लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत करणेत येत असतो. शासन पत्र बाविआ-२००५/प्रक्र३९०/वित्त४ यांचे दि.२० जुलै २००६ चे पत्रान्वये कळविले आहे की, बाराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून आवश्यकतेनुसार पंचायत राज संस्थांच्या दोन किंवा तीनही स्तरांच्या समन्वयांने कामाची / योजनांची निवड करण्यास शासनाची हरकत नाही. उदा. जि.प. त्यांच्या स्तरावरील निधीतून पचांयत समिती/ ग्रामपंचायतीच्या यादीतील काम घेऊ शकेल. पंचायत समित्यांनाही अन्य संस्थाच्या यादीतील कामे / योजना घेता येतील.

TOP

# यशवंत ग्राम समृध्दी योजना

- शासन निर्णय क्रं.२००१/प्र.क्रं.१९४/पंरा-६(४७) दिनांक २७/८/२००२ अन्वये यशवंत ग्राम समृध्दी योजना कार्यान्वीत झाली आहे.

- सदर योजने अंतर्गत ग्रामसभेने कामाची निवड करावी. व काम सर्वसाधारण वस्तीत असल्यास १५ टक्के व दलित,आदिवासी वस्त्यात असल्यास १० टक्के लोकवर्गणी दिनांक २५ आक्टोबर पुर्वी जमा करावी. तदनंतर कामाचा प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केला जातो. पंचायत समितीने प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर करते व जिल्हा परिषदेने शासनाकडे अनुदानाची मागणी केली जाते. सदर योजने अंतर्गत जास्तीत जास्त १०.०० लक्ष पर्यंत काम हाती घेता येते. सदर योजने अंतर्गत खालील कामे ग्रामपंचायतीस हाती घेता येतात.

१. पंचायत राज संस्थांच्या शाळांसाठी शाळा इमारती,क्रिडांगणे.

२. अंगणवाडी इमारती.

३. ग्रामपंचायत कार्यालये (सर्व शासकीय कर्मचा-यांच्या कार्यालयासहीत)

४. गावांतर्गत रस्ते व गटारे

५. दहन व दफन भूमी

६. बस थांबा शेड

७. गाव व वाडयांच्या रस्त्यांवरील विद्दुतीकरणाची कामे.

८. व्यायामशाळा ९.लघूसिंचन कामे.

१०.ग्राम सभेने निवड केलेले काम.

- सदर कामास प्रशासकीय मान्यता ग्रामसभेची घ्यावयाची असते. तसेच तांत्रिक मान्यता सक्षम प्राधिकारी यांची घ्यावी लागते.

  शासनाने अनुदान मंजूर केल्यानंर जिल्हा परिषद ग्रामपंचायतींनी जमा केलेल्या लोकवर्गणीच्या दिनांकाच्या प्राथम्य क्रमाने ग्रामपंचायतींना पंचायत समिती मार्फत अनुदान मंजूर करते. हे अनुदान ग्रामपंचायतीने जमा केलेल्या लोवर्गणीच्या प्रमाणात ८५/९० टक्के असते. ग्रामपंचायतीचे कामांकरीता निधी ४०:४०:२० या प्रमाणे कामाचे प्रमाणात ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन दिला जातो.

- जिल्हा परिषदे मार्फत सदरची कामे पूर्ण केली जातात.
- जिल्हा परिषदे मार्फत सदरची कामे पूर्ण केली जातात. शासनाचे दिनांक ११/६/२००४ चे अधिसूचना क्रं.व्हीपीएम/२६९९/सीआर/१०७१/पीआर४(२२) व शासन पत्र दिनांक १७ जुलै २००४ अन्वये, ग्रामपंचायतींनी यशवंत ग्राम समृध्दीसाठी हाती घेतलेल्या कामांकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून बिनव्याजी व दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करता येईल. असे शासनाने आदेश दिलेले आहेत.

TOP

# तिर्थक्षेत्र विकास योजना.

- शासन निर्णय क्रं.व्हीपीएम/१०९६/२२०/२२ दिनांक २८/१०/१९९७,ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांना क वर्ग दर्जा देणेचे अधिकार जिल्हा नियोजन मंडळास आहेत. ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचे प्रस्ताव जिल्हा परिषद नियोजन कार्यालयास पाठविते नियोजन कार्यालय जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेते.
- क वर्ग तिर्थक्षेत्र स्थळी शासन नियमाप्रमाणे खाली नमूद कामे हाती घेता येतात.

१. पिण्याचे पाण्याची सोय.

२. स्वच्छतागृहे

३. पथदिवे

४. धर्मशाळा

५. भक्तनिवास

६. नदी असेल तर घाट

७. प्रदक्षिणामार्ग

८. वाहनतळ

९. अत्यावश्यक ठिकाणी ॲप्रोच रस्ता २ किलोमीटर पर्यंत दूतर्फा नालीसह.

जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेल्या क वर्ग तिर्थक्षेत्रांचे उपरोक्त कामांचे अंदाजपत्रके जिल्हा परिषदे मार्फत तयार करणेत येउन त्यास मान्यता देउन शासनास निधीची मागणी केली जाते. शासनाकडून अनुदान मंजूर झालेनंतर जिल्हा परिषदेच्या कार्यवाही यंत्रणेकडून सदरची कामे पूर्ण केली जातात.

TOP

## महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र ग्रामीण रोजागार हमी योजने बाबत शासन निर्णय | १) | देशातील ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबांना कमीत कमी १०० दिवास रोजगाराची हमी देण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक - २००५ दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी मंजूर केले. |
| | | २) | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ कलम ४ व २८ अन्वये राज्य शासनाने ,शासन निर्णय नियोजन विभाग क्र रोहयो १० /०५/प्र.क्र.१०४/ रोहयो १०,दिनांक २३ डिसेंबर २००५ अन्वये ''महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना २००५ या नावाने योजना सुरू केली आहे. |
| २. | योजनेचे संक्षित स्वरूप | १) | ग्रामीण भागातील कुटुंबाना कमीत कमी १०० दिवस केंद्र शासना मार्फत , व उर्वरित २६५ दिवस राज्य शासना मार्फत रोजगाराची हमी |
| | | २) | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आर्थिक वर्षाचा कामाचा नियोजन आराखडा दर वर्षी ३१ डिसेंबर पर्यंत अंतिम करावयाचा आहे |
| | | ३) | एकूण कामाचे नियोजन ग्रामपंचायतचे सहभागाने |
| | | ४) | ग्रामपंचायत मार्फत करावयाच्या कामाचे नियोजन अंदाजपत्रके तांत्रिक मंजूरी कार्यान्वयन यंत्रणा व सनियंत्रण जिल्हा कार्यक्रम समन्वयक करतील |
| | | ५) | वार्षिक नियोजन आराखडयात जलसंधारणाच्या कामांना प्रधान्य द्यावयाचे आहे. |
| | | ६) | नोंदणी झालेल्या सर्व कुटुंबाना जॉब कार्ड देणे. |
| | | ७) | संपूर्ण पारदर्शकता सामाजीक अंकंक्षण |
| | | ८) | मजूरांना मजूरीचे वाटप पोष्टा मार्फत. |
| ३. | योजनेचे निकष (पात्रता) | १) | एकूण नियोजनाच्या ५० टक्के कामे ग्रामपंचायत मार्फत करणेत येणार. |
| | | २) | ग्रामपंचायत व्यतिरीक्त उरलेलली ५० टक्के कामे जिल्हयातील शासकीय यंत्रणे मार्फत करण्यात येणार आहेत.त्या कामांचे नियोजन अंदाजपत्रके, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता कार्यान्वयन व सहनियंत्रण जिल्हा कार्यक्रम समन्वयक करतील. |
| | | ३) | ८० टक्के कामे जल व मृदसंधारणाची घ्यावयाची आहेत. |
| | | ४) | हाती घ्यावयाच्या कामाचे अकुशल, कुशल प्रमाण ६० : ४० |
| ४ | योजने करीता तरतूद | | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना साठी जिल्हयाला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | उपलब्ध होणा-या एकूण निधी पैकी अनुज्ञेय ५० टक्के रक्कमेच्या ५० टक्के निधी ग्रामपंचायतकडे वर्ग करणे. |
| ५ | तांत्रिक मंजूरी बाबत अधिकार कोणास आहे. | | | संबधित यंत्रण्ेचे सक्षम अधिकारी. |
| ६ | २५% ५०% ७५% निहाय खर्चाची तरतूद | | | सर्वसाधारण पणे केंद्र शासन - ९० टक्के व राज्य शासन १० टक्के |
| ७ | सदरची योजना कोणकोणत्या स्तरावर राबविण्यात येते | | | ग्रामपंचायत स्तरावर ५० टक्के ग्रामपंचायत मार्फत व ५० टक्के इतर यंत्रणा मार्फत. |
| ८ | योजने करीता आर्थिक मंजूरीचे अधिकार कोणत्या प्राधिकरणास (समिती) मंजूरी बाबतची मार्यादा | १) | १. | गावाचा वार्षिक नियोजन आराखडा - ग्रामसभा त्याची मंजूरी देईल.ग्रामसभेने विहीत वेळेत मान्यता न दिल्यास अंतिम अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प) यांचे राहील |
| | | | २ . | तालुक्याचा एकत्रीत वार्षिक नियोजन आराखडयास पंचायत समिती सभा मंजूरी देईल. |
| | | | ३ . | जिल्हयाचा नियोजन (ग्रा.प) व नियोजन (इतर यंत्रणा) चा एकत्रीत नियोजन आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा मंजूरी देईल.सभेने विहीत वेळेत मान्यता न दिल्यास मा.विभागीय आयुक्त तथा ग्रामीण रोजगार हमी आयुक्त मान्यता देतील. |
| ९ | कामांना प्रशासकीय मान्यता | १ | | मा.उपविभागीय अधिकारी (महसूल) - रू ५ लाख प्रत्येक कामासाठी प्रति तहसिल प्रति वित्तीय वर्षासाठी रू ५० लाखाच्या मर्यादीत. |
| | | २ | | मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक -रु ५० लाख पर्यंत |
| | | ३ | | मा.विभागीय आयुक्त तथा ग्रामीण रोजगार हमी आयुक्त - रू ७५ लाखा पर्यंत |
| | | ४ | | राज्य शासन - ७५ लाखा पेक्षा जास्त. |
| १० | अनुज्ञेय कामे | | | खालील प्रमाणे |

TOP

## परिशिष्ट - २
## महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना मार्गर्शक सुचनेनुसार अनुज्ञेय कामे

राष्ट्रिय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या परिशिष्ट -१ प्रमाणे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत खालील कामावर भर दिला आहे.मार्गदर्शन सुचनेच्या परिच्छेद ५.१ मध्ये राष्ट्रिय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामाची वर्गवारी सुची (अ.क्र.१ ते ९) दिलेली आहे.

१) जलसंधारण व जलसंवर्धन
२) दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहीत)
३) जलसिंचन कालव्यांची कामे.(लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे.)
४) अनुसूचित जाती/अनुसूचीत जमाती नवीन भुधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थींच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.
५) पारंपारीक पाणीसाठयांचे योजनेचे नुतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.
६) भुविकासाची कामे.
७) पूरनियंत्रण,पूरसंरक्षकाची कामे ,पाणथळ क्षेत्रातील चा-याची कामे.
८) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे.
९) केंद्र शासनाशी चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे.

सार्वजनिक पायाभूत साई उपलब्ध करणे साठी आता पर्यंत महाराष्ट्रात रोजगार हमी योजने अंतर्गत शासनाच्या वेगवेगळया विभागातील कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत खालील प्रमाणे कामे करणे येत आाहेत.

अ) कृषि स्वरूपाची कामे.

| | | | |
|---|---|---|---|
| १.माती नाला बांध | २.माती बांध | ३.सिमेंट नाला बांध | ४.दगडी बांध |
| ५.ढाळीचे बांध | ६.कंपार्टमेंट बांध | ७.वनराई बांध | ८.जैविक बांध |
| ९.गॅबीयन बांधारा | १०.सलग समतल चर | ११.तुटक समतल चर | १२.ट्रेंच कम माउन्ट |
| १३.खाजगी जमीन बंधारा | १४.शेत तळी | १५.बोडी नूतनीकरण | १६.नाला सरळी करण |
| १७.जलद बंधारा | | | |

ब) पाटबंधारा.

| | | | |
|---|---|---|---|
| १.मातीचे धरण | २.मातीचे कालवे | ३.साठवण तलाव | ४.पाझर तलाव |
| ५.पाझर कालवा | ६.गाव तलाव | ७. भूमीगत बंधारा | ८.कालव्याचे नुतनीकरण |
| ९.तलावातील गाळ काढणे | १०.जून्या तलावाचे नूतनीकरण | | |

क) वनी करण

| | | | |
|---|---|---|---|
| १.वन तलाव | २.स.स.चर.भु.स.स.चर | ३.ट्रेंच काम माउंट | ४.वृक्ष लागवड |
| ५.रोप वाटीका | ६.फायर लाईन वर्क्स | ७. जून्या वन तलावाचे नूतनीकरण | |
| ८.बांबू राझ्यांभोवती वर्तुळाकार चर | | ९.रायमुनिया /लँटिना निर्मुलन करणे् | |

ड) सार्वजनीक बांधकामः-

| | | |
|---|---|---|
| १.इतर जिल्हा रस्ते | २.गाव रस्ते | ३.गावातील अंतर्गत रस्ते |
| ३.जोड रस्ते | ४.स्मशान भूमी , पाणी पुरवठा,योजनासाठी रस्ते | |
| ६.रस्त्याचे मजबुतीकरण/नुतनीकरण | ७.रस्त्याचे रूंदाकरण | |

एस.सी./एस.टी.च्यामालकीच्या शेतजमीनीवर किंवा शेती सुधारणातील लाभार्थींच्या शेतात वा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थीच्या कुटुंबांच्या शेतजमीनीवर सिचन सुविधा पूरविण्यासाठी ची कामे ही महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घेता येईल.

या व्यतिरीक्त राज्यराच्या रोहयो अंतर्गत खालील वैयक्तीक लाभाच्या योजना वेगवेगळया खात्याकडून राबविण्यात येतात.

१.कृषि विभाग.

| | | |
|---|---|---|
| १.फळबाग योजना | २.खाजगी बोडीची कामे. | ३.मजगी (भात शेत) |
| ४.तूतीची लागवड | ५.बोडी नुतनीकरण | ६.शेत तळे |

२.जिल्हा परिषद :- .जवाहार विहीरीची कामे.

३.सामाजीक वनीकरण :- खाजगी जमीनीवर वृक्ष लागवड

वरील अनुज्ञेय कांमाचा ग्रामपंचायत, पंचायत समिती निहाय वार्षिक नियोजन आराखडा ०१ जुलै ते १५ सप्टेंबर या कालावधीत नियोजन वेळा पत्रका प्रमाणे तयार करणेत येतो.

TOP